<u>डॉ. आंबेडकर महाविद्यालय,</u>

दीक्षाभूमी, नागपूर

# राष्ट्रीय सेवा योजना

2018-2019

## वृत्तपत्रांमधील बातम्या

## मानवी विकासात राष्ट्रीय सेवा योजनेचे योगदान मोलाचे

**डॉ. प्रकाश खरात यांचे प्रतिपादन**
**डॉ. आंबेडकर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस**

**नागपूर :** डॉ. आंबेडकर कॉलेज दीक्षाभूमी, नागपूर येथे महात्मा गांधी जयंती व राष्ट्रीय सेवा योजनेचा स्थापना दिवस साजरा करण्यात आला. यावेळी मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले.

मानवी जीवन विकसित करण्याकरिता विविध संस्था उपयोगी ठरतात. त्याचप्रमाणे राष्ट्रीय सेवा योजना ही मानवी विकासाला गती देणारी एक संस्था आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून तरुणांमध्ये सामाजिक भान निर्माण होते आणि त्यातून समाजसेवा करण्याची ऊर्मी त्यांच्या अंगी येते. संत गाडगे महाराज, महात्मा जोतिबा फुले, लोकहितवादी आगरकर, डॉ.




आंबेडकर अशा थोर समाजसेवकांचा आदर्श तरुणांनी घेतला पाहिजे. मानवी जीवनात अनेक चढउतार येत असतात. त्यातून सावरायला सामाजिक जाणीव उपयोगी ठरते; परंतु आजची तरुणाई पाहता निव्वळ डीजेच्या तालावर नाचून आपल्याच दुनियेत मग्न होत चाललेली आहे. त्यामुळे तरुणांनी मनोरंजनासोबतच अभ्यासाकडेही जास्त लक्ष देण्याची गरज आहे.

आज अनेक प्रकारच्या प्रसारमाध्यमांद्वारे उपयोगी ज्ञान व माहिती आपल्याला मिळते, त्याचा वापरही विद्यार्थ्यांना करता आला पाहिजे. त्यातून मानवी जीवनातील द्वंद्व समजावून घेतले पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक विचारवंत डॉ. प्रकाश खरात यांनी याप्रसंगी केले.

---

**डॉ. प्रकाश खरात यांचे प्रतिपादन**

## रासेयो ही मानवी विकासाला गती देणारी संस्था

म.टा. प्रतिनिधी, नागपूर

मानवी जीवन विकसित करण्यासाठी विविध संस्था उपयोगी ठरतात. याचप्रमाणे राष्ट्रीय सेवा योजना ही मानवी विकासाला गती देणारी संस्था आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. प्रकाश खरात यांनी केले.

दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर कॉलेजमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचा स्थापना दिवस साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख वक्ता म्हणून डॉ. खरात बोलत होते. कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. पी. सी. पवार, उपप्राचार्य डॉ. ए. पी. जोशी. रासेयो कार्यक्रम अधिकारी




विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. प्रकाश खरात. व्यासपीठावर उपस्थित डॉ. पवार आणि इतर मान्यवर.

प्रा. रवींद्र तिरपुडे प्रामुख्याने उपस्थित होते.

डॉ. खरात म्हणाले, 'रासेयोच्या माध्यमातून तरुणांमध्ये सामाजिक भान निर्माण होते. त्यातून समाजसेवा करण्याची उर्मी अंगी येते. संत गाडगेबाबा, महात्मा जोतिबा फुले, लोकहितवादी, आगरकर, डॉ. आंबेडकर अशा थोर समाजसेवकांचा आदर्श तरुणांनी घेतला पाहिजे. मानवी जीवनात अनेक चढउतार येतात. त्यातून सावरायला सामाजिक जाणीव उपयोगी ठरते. परंतु, आजची तरुणाई निव्वळ डीजेच्या तालावर नाचून आपल्याच विश्वात मग्न होत चालली आहे. यामुळे तरुणांनी मनोरंजनासोबतच अभ्यासाकडेही जास्त लक्ष देण्याची गरज आहे. आज अनेक प्रकारच्या प्रसारमाध्यमांद्वारे उपयोगी ज्ञान व माहिती आपल्याला मिळते, त्याचा वापरही विद्यार्थ्यांना करता आला पाहिजे.'

यावेळी उपप्राचार्य डॉ. ए. पी. जोशी यांनी रासेयोचे महत्त्व विषद केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. पवार यांनी महाविद्यालयाच्या आजवरच्या कार्यांचा गौरवोल्लेख केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सी. पी. फरकाडे यांनी केले. यशस्वितेसाठी गझाला अहमद, मयूरी लहाने, प्रा. संगीता सोमवंशी, प्रा. रोहिणी मेश्राम, प्रा. मीरा चौधरी, प्रा. विकास सिडाम, प्रा. विनित झामरे आदींनी सहकार्य केले.

# डॉ. आंबेडकर महाविद्यालयात वृक्षारोपण




**नागपूर** : दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या प्रांगणात महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे वृक्षारोपण करण्यात आले. डॉ. आंबेडकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. सी. पवार, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. किशोर रेवतकर, प्रा. रवींद्र तिरपुडे, प्रा. चंद्रशेखर फरकाडे, प्रा. विकास सिडाम, प्रा. दीपक खोब्रागडे यांच्या हस्ते महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. पवार यांनी विद्यार्थ्याने घरी व परिसरात प्रत्येकी दोन झाडे लावून निसर्गसृष्टी समृद्ध करावी. वृक्षारोपणाच्या माध्यमातून मानवी जीवनात आरोग्यदायी आनंद निर्माण करण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी करावा, असे आवाहन केले. डॉ. रेवतकर यांनी वृक्षारोपणाबद्दल विद्यार्थ्यांनी समाजात जनजागृती करण्याचे आवाहन केले. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी कुणाल गडेकर, प्राजक्ता शंभरकर, सरोज भालाधरे, गझाला अहमद, शिवम झलके व अनेक मान्यवर, प्राध्यापक उपस्थित होते. आभार प्रा. सी.पी. फरकाडे यांनी मानले.






श्रीपाद अपराजित बोलताना.

## डॉ. आंबेडकर महाविद्यालयात रासेयोचे उद्घाटन

◆ नागपूर, १६ ऑगस्ट

दीक्षाभूमीवरील डॉ. आंबेडकर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्घाटन ज्येष्ठ पत्रकार श्रीपाद अपराजित यांच्या हस्ते झाले.

मॉरिस कॉलेजचे डॉ. अनिल बनकर, प्राचार्य डॉ. पी. सी. पवार, कार्यक्रम अधिकारी प्रा. रवींद्र तिरपुडे, प्रा. दीपक खोब्रागडे, डॉ. अरुण जोसेफ, डॉ. विद्याधर शिवणकर, डॉ. प्रकाश भोंगाडे व 'आवाज इंडिया'चे बुलकुंदे उपस्थित होते. देशातील सामान्य माणसांची दुःखे जाणणे हे देशवासीयांचे खरे कर्तव्य आहे. सामान्य माणूस हाच राष्ट्राचा प्राण आहे, कणा आहे. तो अधिकाधिक सशक्त करण्याचा प्रयत्न युवकांनी करावा, असे आवाहन श्रीपाद अपराजित यांनी यावेळी केले.

◂ (तभा वृत्तसेवा)

### न्यू इंग्लिशमध्ये अकरावीचा स्वागत समारंभ

◆ नागपूर, १७ ऑगस्ट

### सधन कुक्कुट विकास गट स्थापना

◆ नागपूर, १७ ऑगस्ट

# डॉ. आंबेडकर महाविद्यालयात वृक्षारोपण

लोकशाही वार्ता/नागपूर

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी नागपूर, येथे ३ जुलैला राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत महाविद्यालयाच्या प्रांगणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. सी. पवार, डॉ. किशोर रेवतकर रा.से.यो.चे कार्यक्रम अधिकारी प्रा. रविंद्र तिरपुडे, प्रा. चंद्रशेखर फरकाडे, प्रा. विकास सिडाम, प्रा. दीपक खोब्रागडे यांच्या हस्ते वृक्षारोपणाचा कार्यक्रम पार पडला.




या प्रसंगी डॉ. पी. सी. पवार म्हणाले प्रत्येक विद्यार्थ्यांनी घरी व परिसरात प्रत्येक दोन झाडे लावून निसर्गसृष्टीला समृद्ध करून मानवी जीवनात आरोग्यदायी आनंद निर्माण करण्याचा निश्चय या प्रसंगी विद्यार्थीनी करावा. तर डॉ. किशोर रेवतकर यांनी वृक्षारोपणाचे महत्व पटवून दिले. प्रा. रविंद्र तिरपुडे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून समाजात जनजागृती करण्याचे आवाहन याप्रसंगी विद्यार्थांना केले. या कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी कुणाल गडेकर, कु. प्राजक्ता शंभरकर, सरोज भलाधरे, कु. गझाला अहमद, शिवम झालके या विद्यार्थीनी प्रामुख्याने भाग घेतला. या वृक्षारोपण कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापकांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे आभार प्रा. सी. पी. फरकाडे यांनी केले.

SHOT ON REDMI NOTE5 PRO
MI DUAL CAMERA

# तरुणांनो, बेसावध राहू नका

## डॉ. पी. सी. पवार यांचे प्रतिपादन

लोकशाही वार्ता/नागपूर

महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्याथानी पूर्ण वेळ मोबाईलवर गुंतून राहून स्वतःचे आयुष्य उद्ध्वस्त करू नका देशातील परिस्थिती वाढती बेरोजजारी व्यसनाधीनता व त्यातून येणाऱ्या नैराश्याकडे जगरूकपणे लक्ष द्या, बेसावधपणे वागू नका आजचा तरुण उद्याचे भविष्य आहे, राष्ट्राची खरी संपत्ती असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ. पी. सी. पवार यांनी केले.

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर येथे १२ जानेवारीला राष्ट्रीय सेवा योजनाद्वारा स्वामी विवेकानंद यांच्या जयंती प्रीत्यर्थ राष्ट्रीय युवा दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. पी. सी. पवार, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, प्रा. रोहिणी मेश्राम, प्रा. सी.पी. फरकाडे, मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात डॉ. पी. सी. पवार म्हणाले, या देशाला थोर विद्वानांची परंपरा लाभलेली आहे. स्वामी विवेकानंद, डॉ. आंबेडकर, डॉ. अब्दुल कलाम अश्या थोर व्यक्तीचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून आपली प्रगती साधता आली पाहिजे. नवसमाज घडविण्यासाठी आपल्या ज्ञानाचा व शक्तीचा उपयोग देशाला कसा करून देता येईल याचा विचार आजच्या तरुणांनी केला पाहिजे. आई, वडील व शिक्षक अथक परिश्रमातून विद्यार्थांच्या जीवनात नवचैतन्य घडविण्याचा सतत प्रयत्न करतात, त्यांच्या प्रयत्नांना यश मिळवून देण्यासाठी सावध असले पाहिजे.

कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी विद्यार्थांना शिक्षकांचे मार्गदर्शन किती मोलाचे असते. हे पटवून देतांना म्हणाले, कितीही कठीण परिस्थिती आली तरी त्यातून मार्ग काढण्याची ताकद विद्यार्थांनी स्वतःमध्ये निर्माण करावी, तारुण्याचे प्रदर्शन इतरांना दाखविण्यासाठी वेळ ही कुणासाठी थांबत नाही. त्यामुळे स्वतःसोबतच इतरांचाही विकास कसा करता येईल यासाठी विचार करावा, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी याप्रसंगी आपापले मनोगत व्यक्त केले, कार्यक्रमाचे आयोजन नयन भस्मे, सरोज भालाधरे, ऋतुजा पुनसे, तुषार वालदे, रजत शेंडे, संगीता सोनभोईर स्मिता भगत, गझला अहमद, शलिनी गौर, कार्यक्रमाचे संचालन प्रा. सी. पी. फरकाडे व आभार प्रा. रोहिणी मेश्राम यांनी केले.

# राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे शहीद जवानांना श्रद्धांजली



लोकशाही वार्ता/नागपूर

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर येथे जम्मू काश्मीर येथील पुलवामा येथे झालेल्या आतंकी हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली देण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे व सह कार्यक्रम अधिकारी प्रा. सी. पी. फरकाडे, प्रा. रोहिणी मेश्राम यांच्या मार्गदर्शनाखाली रा. से. यो. च्या २३० विद्यार्थांनी हातात मेणबत्ती घेऊन रॅली काढली रॅलीमधून विद्यार्थांनी पाकिस्तान मुदार्बाद 'नही सहेंगे नही सहेंगे आतंकवाद नही सहेंगे' अशा प्रकारचे नारे लावून आतंकवाद विरुद्ध आपला रोष व्यक्त केला. रॅलीचे समापन महाविद्यालयात करण्यात आले. आतंकवादावर स्मारक समितीचे सदस्य श्री. विलास गजघाटे, उपप्राचार्य डॉ. ए. पी. जोशी, डॉ. किशोर रेवतकर, डॉ. हेमा मेनन, डॉ. शैलेश बहादुरे डॉ. रवींद्र तिरपुडे, प्रा. दीपककुमार खोब्रागडे यांनी आपले विचार व्यक्त करून सर्वांना दोन मिनिटे स्तब्ध राहून शहीद जवानांना श्रद्धांजली वाहण्यात आली. या कार्यक्रमात महाविद्यालयातील प्रशासकीय अधिकारी डॉ. अरुण जोसेफ, विद्यार्थी व प्राध्यापक सहभागी झाले होते.

# निर्माल्य संकलनाला विद्यार्थ्यांचा हातभार

रजत शेंडे

दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सोनेगाव तलाव येथे गणेशोत्सवादरम्यान निर्माल्य संकलनाचा उपक्रम राबविण्यात आला. सोनेगाव तलाव येथील कृत्रिम तलावात नागरिकांनी गणेशमूर्तींचे विसर्जन करावे, यासाठी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी आवाहन केले. त्याचप्रमाणे मूर्तींबरोबर नागरिकांनी आणलेल्या निर्माल्याचे संकलन करून पर्यावरणपूरक गणेशोत्सवास हातभार लावला. कॉलेजचे रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. रवींद्र तिरपुडे, सहकार्यक्रम अधिकारी प्रा. सी. पी. फरकाडे, कुणाल गडेकर, कुणाल पानतावणे, मयूरी लहाने, प्राजक्ता शंभरकर तसेच इतर विद्यार्थी या उपक्रमात सहभागी झाले होते.






पुलवामा येथील शहीद जवांनांना श्रद्धांजली अर्पण करताना दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर महाविद्यालयाचे विद्यार्थी.

# डॉ. आंबेडकर कॉलेजमध्ये रासेयोतर्फे शहिदांना श्रद्धांजली

नागपूर, ता. २० : जम्मू-काश्मीरमधील पुलवामा येथील आतंकी हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे श्रद्धांजली देण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे व सहकार्यक्रम अधिकारी प्रा. सी. पी. फरकाडे, प्रा. रोहिणी मेश्राम यांच्या मार्गदर्शनाखाली रासेयोच्या विद्यार्थ्यांनी हातात मेणबत्ती घेऊन रॅली काढली. पाकिस्तान मुर्दाबाद, नही सहेंगे नही सहेंगे, आतंकवाद नही सहेंगे अशा घोषणा देत विद्यार्थ्यांनी आतंकवादाविरुद्ध रोष व्यक्त केला. महाविद्यालय परिसरात रॅलीचा समारोप झाला. आतंकवादावर दीक्षाभूमी स्मारक समितीचे सदस्य विलास गजघाटे, उपप्राचार्य डॉ. ए. पी. जोशी, डॉ. किशोर रेवतकर, डॉ. हेमा मेनन, डॉ. शैलेश बहादुरे, डॉ. रवींद्र तिरपुडे, प्रा. दीपककुमार खोब्रागडे यांनी विचार व्यक्त केले. त्यानंतर सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध राहून शहीद जवानांना श्रद्धांजली वाहिली. या कार्यक्रमात महाविद्यालयातील प्रशासकीय अधिकारी डॉ. अरुण जोसेफ यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी व प्राध्यापक सहभागी झाले होते. ऐ मेरे वतन के लोगो, जरा आँख में भर लो पाणी, जो शहीद हुये है उनकी जरा याद करो कुर्बानी, हे देशभक्ती गीत म्हणून दुख:द अंत:करणाने शहीद जवानांना श्रद्धांजली वाहिली.

# डॉ. आंबेडकर महाविद्यालयात दिग्विजय दिन




दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी दिग्विजय दिन साजरा केला. यावेळी स्वामी विवेकानंदांनी शिकागो येथे केलेल्या ऐतिहासिक भाषणाचे वाचन करण्यात आले. कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. रवींद्र कुंभारे, सहकार्यक्रम अधिकारी सी. पी. फरकाडे, प्राचार्य डॉ. पी. सी. पवार उपस्थित होते.

# दिव्यांगांना सक्षम बनवा

## राजेश आसुदानी यांचे आवाहन

*प्रतिनिधी / ४ डिसेंबर*

**नागपूर :** विद्यार्थी ही देशाची शक्ती आहे. डिसअॅबिलिटी ही एक अवस्था बनली आहे. शारीरिक आणि मानसिक अपंगत्व यात फरक असतो. त्यामुळे मानवी मदतीला कधीही तोडू नये. यात अंध विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना अनेक समस्या येतात तरीसुध्दा न डगमगता परिस्थितीवर मात करण्याचे आवाहन दिव्यांग विद्यार्थ्यांना राजेश आसूदानी यांनी केले.

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दिक्षाभूमी येथे हेल्प द ब्लाईंड फाउंडेशन चेन्नई व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिवस साजरा करण्यात आला, त्याप्रसंगी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे राजेश आसुदानी बोलत होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून हेल्प द ब्लाइंड फाउंडेशन चेन्नईचे डॉ. राधाकृष्णन, प्राचार्य डॉ.पी.सी. पवार, प्रशासकीय अधिकारी डॉ. अरुण जोसेफ, रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, डॉ. शैलेश बहादुरे उपस्थित होते. आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिवसाचे औचित्य साधून महाविद्यालयातील दिव्यांग विद्यार्थ्यांना ब्लाईंड फाउंडेशन व महाविद्यालयाच्या वतीने १० हजार रुपये, पांढरी काठी व टी शर्ट देण्यात आले. डॉ. राधाकृष्णन यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य व्हावे म्हणून ही दरवषी संस्था दिव्यांग विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करीत असते. दहावीनंतर काही विद्यार्थी शिक्षण सोडून देतात त्यामुळे त्यांना उच्चशिक्षणापर्यंत पोहचविण्यासाठी बी.ए. पासून ते संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांपर्यंत आर्थिक मदत देऊन त्यांच्या जीवनात प्रकाशाची ज्योत चेतवण्याचे काम संस्थेच्या माध्यमातून केले जाते.




**कार्यक्रमप्रसंगी भंते आर्य नागार्जून सुरेई ससाई, डॉ. राधाकृष्णन्, प्राचार्य डॉ.पी.सी. पवार, डॉ. अरुण जोसेफ, डॉ. रवींद्र तिरपुडे, राजेश आसुदाणी, आदी**

डॉ. आसूदानी आपल्या भाषणात पुढे म्हणाले, मी स्वतः विद्यापीठाच्या परीक्षेत सुवर्णपदक पटकाविले असून आज रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया येथे असिस्टंट मॅनेजर म्हणून काम करतो. डोळस मानसाला लाजवेल असे व्यक्तिमत्त्व माझ्यासारखे दिव्यांग व्यक्ती करू शकतात याचा मला अभिमान वाटतो. विविध परीक्षेमध्ये अंध विद्यार्थी रायटर मिळत नाही. याकरिता महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी स्वतःहून अशा विद्यार्थ्यांना मदत करावी. येणाऱ्या काळात स्पर्धा परीक्षेमध्ये अंध विद्यार्थ्यांना लेखनिक देणे बंद होणार आहे. त्यासाठी नवीन अॅपची निर्मिती होणार आहे. दिव्यांगांच्या संदर्भात वेगवेगळी उदाहरणे देऊन त्यांनी विद्यार्थ्यांच्या मनात नवचेतना निर्माण करण्याचे काम केले. अंध विद्यार्थ्यांनी स्वतः इंटरनेटवर काही ब्लॉग लिहिले पाहिजे. स्वतःच्या समस्या मांडल्या पाहिजे आणि स्वतःधील गुणसुध्दा समाजापुढे सतत दाखविले पाहिजे. कारण डिसअॅबेलिटी ही सर्वांना सक्षम बनविते.

डॉ.पी.सी. पवार म्हणाले, आमच्या महाविद्यालयात सर्वात जास्त अंध विद्यार्थी शिक्षण घेत असून या विद्यार्थ्यांना एनएसएसचे विद्यार्थी मदत करीत असतात. त्यांना योग्य शिक्षण व मदत मिळावी यासाठी महाविद्यालय त्यांना मदत करण्यासाठी सदैव तत्पर असते. त्यांना शिक्षण घेताना कुठल्याही प्रकारचा त्रास होऊ नये म्हणून त्यांना १० रुपयांमध्ये महाविद्यालयात प्रवेश दिला जाते. त्यांच्या जीवनात आनंद कसा निर्माण करता येईलयासाठीसुध्दा महाविद्यालय प्रयत्न करीत असते. कार्यक्रमाला प्राध्यापक व रासेयोचे विद्यार्थी, दिव्यांग विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. शैलेश बहादुरे यांनी, संचालन प्रा.डॉ.रवींद्र तिरपुडे यांनी तर आभार प्रा. रोहिणी मेश्राम यांनी मानले.

# डॉ. आंबेडकर महाविद्यालयात दिग्विजय दिवस

लोकशाही वार्ता/नागपूर

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दि.११ सप्टेंबरला महाविद्यालयातील कुंभारे सभागृहात स्वामी विवेकानंद दिग्विजय दिवस साजरा करण्यात आला.

अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. सी. पवार होते.मंचावर राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. रवींद्र तिरपुडे, सहकार्यक्रम अधिकारी प्रा. सी. पी. फरकाडे उपस्थित होते . स्वामी विवेकानंद यांची १२५ वा शतकोत्तर रोप्य मोहत्सवी जयंती संपूर्ण देशात दिग्विजय दिवस म्हणून साजरी करण्यात येणार आहे. त्यानिमित्ताने ११ सप्टेंबर १८९३ रोजी अमेरिकेतील शिकागो येथे झालेल्या सर्वधर्मपरिषदेमध्ये केलेल्या ऐतिहासिक वाचन प्राचार्य डॉ. पी. सी. पवार, प्रशासकीय अधिकारी डॉ. अरुण जोसेफ प्रा. रवींद्र तिरपुडे, प्रा. संगीता सोमवंशी , प्रा. सी. पी. फरकाडे, , प्रा. दीपककुमार खोब्रागडे, प्रा रोहिनी मेश्राम, प्रा. विद्याधर शिवनकर, डॉ. प्रभाजोत कौर, प्रा. विनीत झामरे व मोठ्या संखेत विद्यार्थी उपस्थित होते. संचालन शुभम यादव यांनी केले. तर आभार शालिनी गौर यांनी मानले.

# आंबेडकर महाविद्यालयात रासेयोचे उद्घाटन

नागपूर : दीक्षाभूमीवरील डॉ. आंबेडकर महाविद्यलयात राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्घाटन करण्यात आले. या उद्घाटन सोहोळ्याला संपादक श्रीपाद अपराजीत, मॉरिस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल बनकर, कार्यक्रम अधिकारी डॉ. पी.सी. पवार, प्रा. रवींद्र तिरपुडे, आवाज इंडिया वाहिनीचे प्रीतम बुलबुंदे आदी उपस्थित होते.

राष्ट्रीय सेवा योजनेला विद्यार्थी जीवनात मोठे महत्त्व असून अभ्यासासोबत स्वतःचे व्यक्तिमत्त्व घडवण्यासाठी व समाजसेवेची भावना निर्माण करण्यासाठी महत्त्वाचे योगदान आहे, असे प्रतिपादन प्रा. रवींद्र तिरपुडे यांनी प्रास्ताविकातून केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्देशावर प्रकाश टाकत त्या उद्देशाचे पालन केल्यास एक सशक्त विद्यार्थी घडू शकतो, असे डॉ. अनिल बनकर म्हणाले. देशातील सामान्य माणसांचे दुःख जाणणे हे देशवासीयांचे खरे कर्तव्य आहे. सामान्य माणूस हाच राष्ट्राचा प्राण आहे. तो अधिकाधिक सशक्त करण्याचा प्रयत्न युवकांनी करावा, असे श्रीपाद अपराजित म्हणाले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी जनजागृती करून भविष्य उद्भवणाऱ्या संकटांवर आ घालण्याचे काम करावे, अ प्रतिपादन प्रीतम बुलबुंदे यांनी के उपस्थितांनी यावेळी समयोचित भा केले. कार्यक्रमाचे संचालन संगी सोनबाईर यांनी केले. प्राज शंभरकर यांनी आभार मानले.

लोकसत्ता Sat, 18 August 2018
epaper.loksatta.com/c/31570797



## राष्ट्रीय सेवा योजनेची सेवा

डॉ. आंबेडकर कॉलेजमधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी या परिसरात सुरक्षाकवच निर्माण केले आहे. अनुयायांना गर्दीतून वाट दाखविण्याच्या कामाबरोबर कुठलाही अनुचित प्रकार होऊ नये, यासाठी ते डोळ्यात तेल घालून पहारा देत आहेत. २५० विद्यार्थी या मोहिमेत सहभागी झाले असल्याचे प्राध्यापक रवींद्र तिरपुडे यांनी सांगितले.

# रासेयोचे दीक्षाभूमीवर योगदान

लोकशाही वार्ता/नागपूर

डॉ. आंबेडकर कॉलेज दीक्षाभूमी, नागपूर येथील राष्ट्रीय सेवायोजनेच्या २५० विद्यार्थ्यांनी कार्यक्रम अधिकारी प्रा. रवींद्र तिरपुडे यांच्या नेतृत्वात धम्मचक्र प्रवर्तनाच्या दिवशी दीक्षाभूमीवर येणाऱ्या देश-विदेशातील जनतेला कुठल्याही प्रकारचा त्रास होऊ नये म्हणून २५० विद्यार्थ्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने सहकार्य केले.



सकाळी ६ वाजेपासून रात्री १२ वाजेपर्यंत या विद्यार्थ्यांनी या दीक्षाभूमी परिसरात आपले मोलाचे योगदान दिले. डॉ. आंबेडकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवायोजनेचे विद्यार्थी दीक्षाभूमीवरच नव्हे तर शहरात खेडोपाड्यात जाऊन लोकांची मदत करतात. आपल्या कार्यातून इतरांना प्रोत्साहन मिळेल अशाप्रकारचे काम ते करीत आहे.

तरुण भारत

Nagpur Edition | 2019-02-21 | Page- 7

## डॉ. आंबेडकर महाविद्यालय



डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या वतीने पुलावामा घटनेच्या विरोधात मेणबत्ती रॅली काढून शहीदांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. रॅलीची सांगता महाविद्यालयात करण्यात आली. मेणबत्ती रॅलीत रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, प्रा. सी. पी. फरकाडे, प्रा. रोहिणी मेश्राम यांचा प्रामुख्याने सहभाग होता. याप्रसंगी स्मारक समितीचे सदस्य विलास गजघाटे, उपप्राचार्य डॉ. ए. पी. जोशी, डॉ. किशोर रेवतकर, डॉ. हेमा मेनन, डॉ. शैलेश बहादुरे, प्रा. दीपककुमार खोब्रागडे यांनी विचार व्यक्त केले.

Powered by Bharati Web Pvt Ltd